# देशातील पहिली भुयारी मेट्रो डिसेंबर २०२१मध्ये धावणार!

**मुंबई (प्रतिनिधी) :**

देशातील पहिल्याच भुयारी मेट्रोचा कुलाबा ते सिप्झ मार्ग पूर्ण झाला असून, डिसेंबर २०२१ मध्ये वांद्रे ते कुर्ला संकुल ते आरे वसाहतदरम्यान पहिली मेट्रो धावू लागेल, अशी माहिती 'मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन'च्या वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. यासाठी सुमारे १८ हजार कोटी रुपये खर्च करण्यात आल्याचेसुद्धा अधिकाऱ्याने सांगितले.

३३.५ किमी लांबीच्या मेट्रो मार्गात दोन मार्गिका असून आतापर्यंत सुमारे ४५ टक्के म्हणजेच २४.५ किलोमीटर लांबीच्या भुयाराचे काम पूर्ण झाले आहे. त्यामध्ये कफ परेड ते हुतात्मा चौकदरम्यान दोन किमी, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते ग्रँट रोड दरम्यानच्या ७ किमीपैकी साडेचार किमी लांबीच्या भुयारीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. तसेच सिद्धिविनायक मंदिर दादर ते शितळादेवी मंदिर माहीम दरम्यान १० किमी पैकी ६ किलोमीटर, धारावी ते सांताक्रूझ दरम्यानच्या ७ किमी पैकी ४ किलो मीटर लांबीच्या मार्गाचे काम पूर्ण झाले आहे. संपूर्ण मार्गाचे काम साधारणपणे मे २०२२ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा असल्याचे कळते. या मार्गावर एकूण २६ भूमिगत स्थानक असून त्यांचीही कामे प्रगतिपथावर आहेत. या २६ पैकी १२ स्थानकांमध्ये खोदकाम पूर्ण झाले असून, स्थानक उभारणीचे काम सुरू आहे, तर १२ स्थानकांमध्ये अद्यापही खोदकाम प्रगतिपथावर आहे. पुढील दोन महिन्यांत तेथेही स्थानक उभारणीचे काम सुरू होईल. मात्र, गिरगाव आणि काळबादेवी येथे जागा उशिरा उपलब्ध झाल्याने तिथे सध्या पायलिंगची कामे चालू असल्याची माहितीही या अधिकाऱ्याने दिली. त्यामुळे मुंबईकरांसाठी दिलासादायक बाब म्हणजे देशातील पहिली भुयारी मेट्रो डिसेंबर २०२१ पर्यंत धावेल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.